# प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/7586/२०१९ पुणे शहर, दिनांक १९/०९/२०१९.

**विषय :- दिनांक- १४/०९/२०१९ रोजीचे " महालोकअदालत " मध्ये केसेस निकाली निघाले बाबत....**

---

पुणे शहरामध्ये वाहतुक शाखेकडून शहरातील वाहतुक सुरळीत व सुरक्षित राहणेकरीता दररोज वाहतुकीचे नियमन केले जात असुन जे वाहनचालक वाहतुक नियमांचे पालन करीत नाहीत अशा वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्याप्रमाणे चौकांमध्ये व सीसीटीव्हीद्वारे कारवाई करण्यात येते.सदर कारवाईत सीसीटीव्ही द्वारे करण्यात येणा-या केसेस व एल टेम केसेस तसेच ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह च्या केसेस ह्या मोटार वाहन न्यायालय, शिवाजीनगर,पुणे येथे दाखल केल्या जातात.

वाहतुक शाखेचे पोलीस उप आयुक्त, पंकज देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली वाहतुक शाखेतील खटला विभागाचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक- शुभदा शितोळे,सहा.पोलीस निरीक्षक-श्रीमती जाधव व कर्मचारी यांनी, दिनांक- १४/०९/२०१९ रोजी मोटार वाहन न्यायालय, शिवाजीनगर पुणे येथे आयोजीत केलेल्या महा-लोकअदालत करीता, ३३०० वाहनचालकांना वेळेत समन्सची बजावणी करुन वाहतुक शाखेकडून वाहनचालकांवर करण्यात आलेल्या वाहतुक नियमभंगाच्या केसेस ठेवण्यात आल्या होत्या त्यापैकी एकुण १०३२ केसेस मध्ये ३ लाख २७ हजार ऐवढा तडजोड शुल्क वसुल केला. वाहतुक शाखेकडून वाहतुक नियमभंगाचे खटले महालोकअदालत मध्ये ठेवल्यामुळे प्रलंबीत खटल्याची निर्गती झाली असुन नागरीकांच्या वेळेची बचत झाली आहे.

वाहतुक नियमांचा भंग करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करुन त्याचे विरुध्दचे खटले न्यायालयात दाखल केले असता मा.न्यायालयाकडुन बेशिस्त वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई होत असल्याने वाहनचालकांच्या स्वतःचे सुरक्षिततेच्या दृष्टीने व शहरातील वाहतुक सुरळीत व सुरक्षीत होणेकरीता वाहतुकीचे नियम पाळणे गरजेचे आहे.

(शुभदा शितोळे)
पोलीस निरीक्षक,खटला विभाग,
वाहतूक शाखा पुणे शहर

प्रत :- सर्व संबधितांना.